# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.१५/आ-६ दिनांक :- १ .१२.२०२३.

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांना उप विभागीय अधिकारी (यांत्रिकी) या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदांवर तात्पुरती पदोन्नती.**

## कार्यालयीन आदेश

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्तपदे दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले खालील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी) यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७/५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन रुपये S-२० : ५६१००-१७७५००/- या वेतनश्रेणीत तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने उप विभागीय अधिकारी (यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर

तात्पुरती पदोन्नती देऊन खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्ये.सू. क्र. | कनिष्ठ अभियंता (यां.) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २५ | श्री.एम.पी.पतंगे | म.जी.प्रा.उपविभाग, देऊळगांव राजा | म.जी.प्रा.विभाग, बुलढाणा | रिक्तपदी |
| २ | २६ | श्री.डी.एस.बेंडखळे | म.जी.प्रा.विभाग, सिंधुदूर्गनगरी | म.जी.प्रा.यांत्रिकी मंडळ, सिडको भवन, नवी मुंबई | रिक्तपदी |
| ३ | २७ | श्री.हेमंत ह.गुहेकर | म.जी.प्रा.उपविभाग, वाणगांव, जि.पालघर | म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, पालघर | रिक्तपदी |
| ४ | २८ | श्री.प्रविण के.चुरे | म.जी.प्रा.उपविभाग क्र.१, गोंदिया | म.जी.प्रा.विभाग, गोंदिया | रिक्तपदी |
| ५ | २९ | श्री.राजकुमार डी. आवळे | म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, सातारा | म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, सातारा | रिक्तपदी |
| ६ | ३० | श्री.विजय व.हिंवसे | म.जी.प्रा.विभाग, नागपुर | म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अमरावती | रिक्तपदी |
| ७ | ३१ | श्री.आसिस डी. गवंडी | म.जी.प्रा.मंडळ, पुणे | म.जी.प्रा.विभाग क्र.२, पुणे | रिक्तपदी |

३. वरील विवरणपत्रातील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांना उप विभागीय अधिकारी (यांत्रिकी) या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार केवळ उप विभागीय अधिकारी या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) वरील अभियंता यांना उपविभागीय अधिकारी (यांत्रिकी) या पदावर दिलेली तात्पुरती पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दि. ७.५.२०२१ अनुसार तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

३/-

ब) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा उपविभागीय अधिकारी (यांत्रिकी) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क) उपरोक्त पदोन्नत उपविभागीय अधिकारी (यांत्रिकी) यांच्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

४. पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी १ महिन्याच्या आत रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास सादर करावा. पदोन्नत अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष्य सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

५. संबंधीत कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांनी उप विभागीय अधिकारी (यांत्रिकी) पदी दिलेली पदोन्नती स्वीकृत न केल्यास, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन/ १९९९/प्र.क्र.२/ ९९/ सेवा-३, दि.२०.७.२००१ अन्वये संबंधीतास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा म्हणजेच उप विभागीय अधिकारी पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला असेल तर सदर लाभ काढून घेण्यात येईल. या अनुषंगाने पदोन्नती स्वीकृत न करणारे कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरणी संबंधीत कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

DSD 11/12/23

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत : माहितीस्तव.**

- मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव.
- मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
- मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर / अमरावती /नागपुर.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्यालय, मुंबई / गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन / म.नि.स.स.कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे/पनवेल/ पुणे/अमरावती / अकोला/नागपुर
- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, पालघर/सिंधूदुर्गनगरी/गोंदिया /बुलडाणा/ज.व्य.विभाग, सातारा/ ज.व्य.विभाग, अमरावती/ विभाग क्र.२, पुणे /नागपुर
- उप अभियंता, म.जी.प्रा. आय.टी.सेल, सिडको भवन, नवी मुंबई
- लेखा अधिकारी (रोखशाखा), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई
- कक्ष अधिकारी, आस्था-१ (उविअ)/ आस्था-२ (विचौ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- पदोन्नत उप विभागीय अधिकारी (यांत्रिकी)
- कार्यालयीन आदेश धारिका.